Registered with the Registrar of news papers for India under No. 20826 / 1971

मूल्य : रु. ५/-

मासिक

# वैश्य विजय

कोंकणस्थ (संगमेश्वरी) वैश्य समाजाचे मुखपत्र

वैश्य महाजनवाडी, ६ शेणवीवाडी, खाडिलकर रोड, मुंबई - ४.

वर्ष ४४ वे | फेब्रुवारी २०१६ | अंक २ रा (पृष्ठ १६)



## यशस्वी भव...!




वर्षभरातील विविध सणांची रंगत सरता सरता आता बहुसंख्य बांधवांना वेध लागतात परीक्षांचे. त्या परीक्षांना बसणाऱ्या परीक्षार्थींच्या यशस्वीतेचे. दहावी/बारावी हे विद्यार्थी जीवनातले महत्त्वाचे टप्पे. ह्या परीक्षांचे निर्णयही बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाला कलाटणी देणारे ठरतात. आयुष्याच्या या महत्त्वाच्या टप्प्यांवर परीक्षेच्या तयारीसाठी केलेल्या परीक्षांबरोबरच विद्यार्थ्यांना गरज असते ती आपलेपणाच्या शुभेच्छांची, आशीर्वादांची. त्यांच्या यशस्वीतेत त्याचा काही तरी हातभार असतोच. म्हणूनच दहावी/बारावीच्या परीक्षांना बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांस संस्थेतर्फे हार्दिक शुभेच्छा! यशस्वी भव।

## ६७ वा प्रजासत्ताक दिन संपन्न



भारतीय प्रजासत्ताकाचा ६७ वा प्रजासत्ताक दिन दिनांक २६ जानेवारी २०१६ रोजी सकाळी १० वाजता संस्थेच्या गिरगांव येथील महाजनवाडीच्या गच्चीवर संपन्न झाला. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ समाजबांधव व पंचमंडळ सदस्य हजर होते. वधू-वर सूचक समितीचे चिटणीस श्री. मनोहर खातू यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे खजिनदार श्री. प्रदिप गांगण व कला मनोरंजन समितीचे अध्यक्ष श्री. नितीन वि. शेट्ये यांनी प्रजासत्ताक दिनाचे थोडक्यात महत्त्व सांगितले. संस्था विविध सण साजरे करीत असताना राष्ट्रीय सणही तेवढ्याच उत्साहात नियमीतपणे साजरे करीत असते.